शासनाकडे करावयाच्या पत्रव्यवहाराबाबत...

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०१२/ प्र. क्र.१२५/पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १७ जुलै, २०१२

वाचा : १. उप सचिव, पापुवस्ववि यांचे अर्धशासकीय पत्र क्र.ग्रापापु-२००६/ प्र.क्र.३८१/ पापु-०७, दि.२८ सप्टेंबर,२००६.

२. प्रधान सचिव,पा.पु.व स्व.वि.यांचे अ.शा.प.क्र.जस्वप्र १२११/प्र.क्र.११९/पापु-११ ,दि.१९/१२/२०११

**प्रस्तावना:**

शासनस्तरावर केंद्र शासन, संसद सदस्य, विधान मंडळ सचिवालय, मा.मंत्री, राज्यमंत्री लोकप्रतिनिधी, तसेच अतिमहत्वाच्या व्यक्ती, सामाजिक संस्था, सामान्य नागरिक यांचेकडून विविध विषयांवर पत्रव्यवहार प्राप्त होतो. या पत्रव्यवहाराचे अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्याकडून माहिती /अहवाल मागविण्यात येतात.

याबाबत असा अनुभव आहे की, अनेकदा स्मरणपत्रे पाठवूनही तसेच दुरध्वनीवरुन कळवूनही शासनाकडे अहवाल / माहिती विहित वेळेत सादर केली जात नाही. तसेच सादर केलेली माहिती/अहवाल ही बरेचदा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरी ऐवजी अन्य अधिका-यांच्या स्वाक्षरीने उदा. कार्यकारी अभियंता,अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात येते. त्यामुळे या माहिती / अहवालास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मान्यता आहे किंवा कसे याचा बोध होत नाही.

तसेच सततच्या होणा-या कार्यालयीन पत्रव्यवहारामुळे मूळ कामकाजास विलंब होऊन तक्रारींना विहीत वेळेत उत्तर न देणे,विधीमंडळ कामकाज विलंबाने सादर होणे यासारख्या बाबींमुळे विधानमंडळ सचिवालयाकडून विभागास नाराजी पत्करावी लागते.

यासंदर्भात विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील उप सचिवांच्या अर्धशासकीय पत्रान्वये तसेच संदर्भ क्र.२ येथिल प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हा परिषदांकडून शासनाकडे होणा-या पत्रव्यवहारासंदर्भात सुस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदांकडून शासनाकडे होणारा पत्रव्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करणे अभिप्रेत आहे. मात्र अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी /कार्यकारी अभियंता यांच्याकडून या सूचनांचे पालन होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. ही बाब निश्चितच कार्यालयीन शिष्टाचारास धरून नाही. सबब, या यासंदर्भात सुस्पष्ट सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त बाबींचा विचार करून पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :

१) जिल्हा परिषदांकडून शासनाकडे करण्यात येणरा सर्व पत्रव्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीनेच करण्यात यावा.

२) जिल्हा परिषदांकडून शासनाकडे करण्यात येणरा सर्व पत्रव्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीनेच करण्यात येईल याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची राहिल.(उदा.पाणी पुरवठा विषयाच्या बाबतीत कार्यकारी अभियंता,ग्रामीण

पाणी पुरवठा विभाग यांचा व स्वच्छता विषयाच्या बाबतीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.)

३) मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरी ऐवजी इतर अधिका-यांच्या स्वाक्षरीने प्राप्त होणा-या पत्रव्यवहाराची शासनस्तरावर दखल घेतली जाणार नाही.

४) या सुचनांचे पालन काटेकोरपणे पालन न झाल्यास संबंधित अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांच्याऐवजी पत्रावर सही करणारा अधिकारी) शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असू त्याचा संगणक सांकेतांक २०१२०७१७१४३९३७१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(शैला ए.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७